जनमानसाचा निडर आवाज...
# पुणे प्राईम न्यूज
मुख्य संपादक : जनार्दन दांडगे




दैनिक | वर्ष १ | अंक १८९ | गुरुवार, २९ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



### भावपूर्ण श्रद्धांजली...

महाराष्ट्राचा दादा हरपला; विमान अपघातात अजित दादा पवार यांचे निधन. महाराष्ट्रावर शोककळा.
टीव्ही स्क्रीनवर अजित पवार राहिले नाहीत ही बातमी फ्लॅश झाली आणि एकाच वेळी महाराष्ट्राच्या 'राजकीय पटलावर' आणि सामान्य माणसाच्या 'मनावर' सन्नाटा पसरला.

एका पत्रकाराच्या नजरेतून पाहताना, अजितदादा म्हणजे महाराष्ट्राच्या प्रशासनावरील 'हुकुमत' होती.
फाईलवरची त्यांची सही आणि निर्णयाचा वेग म्हणजे राज्याच्या विकासाचे इंजिन होते. वादळे आली, सरकारे बदलली, पण दादांची 'काम करण्याची स्टाईल' कधीच बदलली नाही. ते एक 'Political Powerhouse' होते, ज्यांच्याभोवती राजकारण फिरायचे.

पण... कॅमेरा आणि माईक बाजूला ठेवले की, सामान्य माणसासाठी ते फक्त 'दादा' होते. पहाटे ५ वाजता मंत्रालयात हजर होऊन, रांगेत उभ्या असलेल्या शेवटच्या माणसाची कैफियत ऐकणारा हा 'लोकनेता' होता. हे काम होईल किंवा हे होणार नाही, घरी जा - असं तोंडावर सांगायला जी हिंमत लागते, ती फक्त त्यांच्यातच होती. खोट्या आश्वासनांच्या जगात त्यांनी 'सत्य' बोलण्याची पद्धत जपली.

बातमी देताना वाटतंय, आपण केवळ एक 'उपमुख्यमंत्री' गमावला नाहीये, तर महाराष्ट्राला शिस्त लावणारा एक 'कार्यसम्राट' आणि शब्दाला जागणारा एक 'अस्सल माणूस' गमावला आहे.

सह्याद्रीच्या कडेकपारीत तुमचा तो करारी आवाज आता घुमत राहील...
अलविदा, दादा!

- जनार्दन दांडगे
(मुख्य संपादक- पुणे प्राईम न्यूज नेटवर्क)

# राजकारणातील 'धुरंदर दादा' काळाच्या पडद्याआड; महाराष्ट्रावर शोककळा

## बारामतीत आज अंत्यसंस्कार; पंतप्रधानांसह देशातील अनेक नेते राहणार उपस्थित

**बारामती, ता. २८ :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा ज्येष्ठ राजकीय नेते अजित पवार यांचे बुधवारी (ता. २८) सकाळी बारामती जवळ झालेल्या भीषण विमान अपघातात निधन झाले. त्यांच्यावर आज गुरुवारी सकाळी ६ ते ९ या वेळेत त्यांचे मूळ गाव काटेवाडी (ता. बारामती) येथे अंत्यदर्शन होईल. सकाळी ९ वाजता गदीमा सभागृहातून अंत्ययात्रेला सुरुवात होणार असून, ११ वाजता अंत्यसंस्कार विधी पार पडणार आहे.



यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्यातील अनेक नेते अंत्यसंस्काराला उपस्थित राहणार असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीचीही शक्यता वर्तवण्यात येत आहे.

मुंबईहून बारामती येथे जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी निघालेले व्हीएसआर कंपनीचे खाजगी विमान सकाळी ८.१० वाजता उड्डाण करून सुमारे ८.५० वाजता बारामतीत लँड होणे अपेक्षित होते. म त्र, गोजुबावी परिसरात लँडिंगदरम्यान विमानाचा ताबा सुटला आणि ते जमिनीवर कोसळले. अपघातानंतर विमानाला तात्काळ आग लागली आणि अवशेष परिसरात विखुरले गेले. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह सुरक्षा रक्षक विदीप जाधव, पायलट कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन शांभवी पाठक आणि फ्लाइट अटेंडंट पिंकी माळी यांचा मृत्यू झाला.

२२ जुलै१९५९ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील देवळाली येथे जन्मलेल्या अजित पवार यांनी १९८२ मध्ये सहकार क्षेत्रातून आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात केली. श्री छत्रपती सहकारी साखर कारखान्याचे संचालक म्हणून निवडून येत त्यांनी ग्रामीण भागात आपली मजबूत पकड निर्माण केली.१९९१ मध्ये ते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष झाले आणि तब्बल १६ वर्षे हे पद त्यांनी भूषवले.

१९९१ मध्ये संसदीय राजकारणात प्रवेश करत ते बारामती लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले. मात्र, शरद पवार यांच्या केंद्रीय मंत्रिमंडळातील समावेशानंतर त्यांनी अवघ्या अडीच महिन्यांत खासदारकीचा राजीनामा दिला. त्यानंतर शरद पवार यांच्या रिक्त झालेल्या विधानसभा जागेवरून अजित पवार विधानसभेत निवडून गेले.

१९९५ पासून २०२४ पर्यंत सलग सात वेळा ते बारामती मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. कृषी, जलसंपदा, ऊर्जा, ग्रामीण विकास आणि अर्थ यांसारखी महत्त्वाची खाती त्यांनी सांभाळली. प्रशासनावर मजबूत पकड असलेला नेता अशी त्यांची ओळख होती. महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्रीपद भूषविणारे ते एकमेव नेते ठरले.

### मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी केले सांत्वन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे बारामतीत दाखल झाले आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार उपस्थित होत्या. तसेच खासदार सुप्रिया सुळे देखील होत्या.

### राजकीय वळणांचे साक्षीदार

अजित पवार यांच्या कारकिर्दीत काही महत्त्वाचे राजकीय टप्पे विशेष चर्चेत राहिले. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबतचा पहाटेचा शपथविधी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर महायुती सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय या घटनांनी राज्याच्या राजकारणाला कलाटणी दिली. त्यांच्या वक्तशीरपणा, थेट निर्णयशैली आणि कामाच्या गतीमुळे ते कार्यकर्त्यांमध्ये विशेष लोकप्रिय होते. अजित पवार यांच्या निधनानंतर बारामती व बीड येथे बंद पाळण्यात आला असून, लोकसभेतही त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सहकार क्षेत्रात अपरिमित हानी झाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# उरुळी कांचनच्या प्रयागधाम रोडवर कुत्र्यांचा धुमाकूळ ; महिन्याभरात ४० जणांना चावा

**उरुळी कांचन, ता. २८ :** उरुळी कांचन (ता. हवेली) येथील प्रयागधाम रोडवरील बगाडे वस्ती परिसरातील खोमणे वस्तीजवळ मोकाट कुत्र्यांनी अक्षरशः दहशत निर्माण केली असून, गेल्या महिन्याभरात किमान ३५ ते ४० नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याचे समोर आले आहे. लहान मुले, महिला, वृद्ध, दुचाकीस्वार यांना लक्ष्य करून हे कुत्रे हल्ले करत असताना प्रशासन, ग्रामपंचायत आणि लोकप्रतिनिधी मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



तेज प्लॅटिनम सोसायटीपासून बगाडे वस्तीपर्यंतचा संपूर्ण परिसर रात्रीच्या वेळी मोकाट कुत्र्यांच्या दहशतीखाली आहे. अनेक जण कुत्रे पाळत असले तरी रात्रीच्या वेळी ती कुत्री मोकाट सोडली जातात. हीच पाळीव कुत्री रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांवर धाव घेत चावा घेत आहेत. दुचाकीस्वारांच्या मागे धावून अपघात घडवून आणण्याचे प्रकारही सातत्याने घडत आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, या कुत्र्यांना रेबीजची लस दिलेली नसल्याचे समोर येत आहे. कुत्रे पाळण्यासाठी आवश्यक असलेले लायसन्सही संबंधितांकडे नाही. चावा घेतल्यानंतर नागरिकांनी खोमणे वस्तीतील संबंधितांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला असता, त्यांना शिवीगाळ करून हाकलून देण्यात आले. उपचाराचा खर्च देण्यासही स्पष्ट नकार दिला जात आहे. परिणामी गरीब, कष्टकरी नागरिकांना विनाकारण दवाखान्याचा खर्च आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.


दरम्यान, या गंभीर प्रकरणाची आजपर्यंत कोणीही ठोस दखल घेतलेली नाही. ग्रामपंचायत, आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग आणि पोलीस प्रशासन कुणीही पुढाकार घेतलेला नाही. विशेष म्हणजे सध्या निवडणुका तोंडावर असल्याने मतं दुखावू नयेत या भीतीपोटी संबंधितांवर कारवाई केली जात नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

**कारवाई कधी होणार?**

नेते गप्प, प्रशासन गप्प, आणि नागरिक असहाय्य -अशी अवस्था निर्माण झाली आहे. आंधळा दळतो, कुत्रं पीठ खातं अशी परिस्थिती येथे पाहायला मिळत आहे. एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच प्रशासन जागे होणार का? मोकाट कुत्र्यांवर तात्काळ कारवाई, लसीकरण, लायसन्स तपासणी आणि दोषींवर कठोर कारवाई कधी होणार, असा थेट सवाल संतप्त नागरिकांकडून केला जात आहे.

# अजित पवार यांना श्रद्धांजली म्हणून पुण्यातील सर्व दुकाने आज बंद

**पुणे, ता. २८ :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण राज्यात शोककळा पसरली असून ही घटना अत्यंत धक्कादायक व वेदनादायी आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आज गुरुवार (ता. २९) रोजी पुणे शहरातील सर्व व्यापारी आस्थापने पूर्ण दिवस बंद ठेवण्याचा निर्णय पुणे व्यापारी महासंघाने घेतला आहे, अशी माहिती महासंघाचे अध्यक्ष फतेचंद रांका व सचिव महेंद्र पितळीया यांनी दिली.



जनतेच्या सेवेसाठी अखंड कार्यरत असलेले, कर्तव्यदक्ष, परखड व प्रभावी नेतृत्व आज महाराष्ट्राने गमावले असून ही हानी भरून न निघणारी असल्याची भावना रांका यांनी व्यक्त केली. अजित पवार यांनी आपल्या सार्वजनिक जीवनात राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. प्रशासनातील कार्यक्षमता वाढवणे, उद्योग-व्यवसाय तसेच व्यापारी वर्गाच्या प्रश्नांकडे सकारात्मक दृष्टीने पाहून निर्णय घेणे, ही त्यांची कार्यपद्धती होती. पुणे शहर व जिल्ह्याच्या पायाभूत सुविधा, अर्थकारण व व्यापारी हितसंबंधांसाठी त्यांनी दिलेले योगदान सदैव स्मरणात राहील, असेही ते म्हणाले.

या दुःखद प्रसंगी पुणे व्यापारी महासंघाच्या वतीने अजित पवार यांच्या कुटुंबीयांप्रती, आप्तस्वकीयांप्रती व असंख्य समर्थकांप्रती मनःपूर्वक शोकसंवेदना व्यक्त करण्यात आल्या आहेत. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो तसेच या कठीण काळात कुटुंबीय व अनुयायांना दुःख सहन करण्याचे बळ देवो, अशी प्रार्थना सचिव महेंद्र पितळीया यांनी केली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात २८ ते ३० जानेवारी या कालावधीत तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती सामान्य प्रशासन (राजशिष्टाचार) विभागामार्फत देण्यात आली आहे.

दरम्यान, या काळात नियमितपणे राष्ट्रध्वज फडकविण्यात येणाऱ्या सर्व शासकीय इमारतींवर राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येणार असून कोणतेही शासकीय मनोरंजन कार्यक्रम आयोजित केले जाणार नाहीत. तसेच आज राज्यातील सर्व शासकीय कार्यालये बंद राहतील, असेही कळविण्यात आले आहे.

# महाराष्ट्रात तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर; मुख्यमंत्री फडणवीसांची घोषणा

**मुंबई, ता. २८ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष आणि राज्याचे ज्येष्ठ नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात आकस्मिक निधन झाले आहे. या धक्कादायक बातमीने संपूर्ण देशावर शोककळा पसरली असून राजकीय वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.



अजित पवारांच्या निधनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यभरात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर केली. या पार्श्वभूमीवर राज्यातील शाळांना येत्या २८ ते ३० जानेवारीदरम्यान सुट्टी जाहीर करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह या दोघांनीही महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून बारामती येथील विमान अपघाताबाबत माहिती घेतली.


दुसरीकडे, प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार विमान धावपट्टीवर उतरत असतानाच ही दुर्घटना घडली. विमान कोसळताच त्याने पेट घेतल्याने ते संपूर्ण जळून खाक झाले. प्रधानमंत्री, गृहमंत्री सर्वांशी चर्चा करून त्यांनाही घडलेल्या परिस्थितीची सगळी कल्पना मी दिली आहे. त्यांनीही याबद्दल प्रचंड दुःख हे व्यक्त केलेलं आहे, एकूणच देशातच या संपूर्ण प्रकरणामुळे हळहळ पसरलेली आहे.

पुढच्या सगळ्या गोष्टी ज्या आहेत त्या परिवाराशी चर्चा करून ठरवण्यात येतील. सकाळी सुप्रियाताईंची माझं बोलणं झालं. त्यानंतर पार्थ पवारांशी माझं बोलणं झालं. एकदा संपूर्ण परिवार बारामतीला पोहचल्यानंतर पुढच्या सगळ्या गोष्टींचे निर्णय हे त्यांच्या संमतीने घेतले जातील. महाराष्ट्रामध्ये आज शासकीय सुट्टी आम्ही घोषित केलेली आहे, तीन दिवसाचा दुखवटा देखील जाहीर करण्यात आलेला आहे, पुढच्या सर्व बाबींची कल्पना लवकरच देण्यात येईल, पण मला असं वाटतं की कधीकधी भरून न निघणारं अशा प्रकारचं नुकसान आहे.

दरम्यान, महाराष्ट्रातून असे लोकनेते गेल्यावर जी पोकळी निर्माण होते ती भरून काढणं अतिशय कठीण आहे, आणि निश्चितच इतक्या जवळून आणि इतक्या संघर्षाच्या काळात एकत्रित काम केलेला आहे, त्यातनं अशा गोष्टीवर विश्वास ठेवायला मन तयार होत नाही, अशी भावना देखील देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केली आहे.

# पुणे–सोलापूर महामार्गावर आता होणार ६ नवीन उड्डाणपूल; उपघात रोखण्यासाठी उपाययोजना

**पुणे, ता. २८ :** पुणे-सोलापूर महाम र्गामुळे दोन्ही शहरांमधील प्रवास वेगवान आणि सोयीस्कर झाला असला, तरी वाढत्या अपघातांमुळे हा महामार्ग चिंतेचा विषय ठरत आहे. विशेषतः सोलापूरपुणे मार्गावर गेल्या काही काळात अपघातांचे प्रमाण लक्षणीय वाढले असून, प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने अपघात रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे.



महामार्गावर सावळेश्वर ते वरवडे टोल नाक्यादरम्यान एकूण ६ नवीन उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत. याआधी मोहोळ येथे एक उड्डाणपूल बांधण्यात आला असून, त्याचा सकारात्मक परिणाम दिसून आल्याने आता उर्वरित धोकादायक ठिकाणांवरही असेच पूल उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्राधिकरणाच्या अभ्यासानुसार, या मार्गावर होणाऱ्या बहुतांश अपघातांची कारणे सर्व्हिस रोडचा चुकीचा वापर आणि विरुद्ध दिशेने होणारी वाहतूक ही आहेत.

सध्या सर्व्हिस रोड चारचाकी आणि जड वाहनांसाठी अपुरा पडत आहे. त्यामुळे वाहने महामार्गावर अचानक शिरतात, ओव्हरटेक करतात आणि याच ठिकाणी अपघात होतात. महामार्गाचे काम सुरू असताना वाहतूक नियंत्रित होती, मात्र काम पूर्ण झाल्यानंतर वेग वाढला आणि त्यासोबत अपघातांचे प्रमाणही वाढले. त्यामुळे आता उड्डाणपूल हा कायमस्वरूपी उपाय मानला जात आहे.

मोहोळ आणि माढा तालुक्यातील चिखली, यावली, अर्जुनसोंड, शेटफळ, सावळेश्वर आणि रांझणी या ६ ठिकाणी उड्डाणपूल उभारले जाणार आहेत. चिखली येथील काम अंतिम टप्प्यात असून, यावली येथील उड्डाणपूल पुढील दीड महिन्यात पूर्ण होण्याची शक्यता आहे. अर्जुनसोंड येथे सर्व्हिस रोडचे काम शिल्लक असून त्यासाठी सुमारे ११ महिने लागणार आहेत.

दरम्यान, उड्डाणपुलांची कामे सुरू असल्यामुळे यावली, शेटफळ आणि चिखली परिसरात वाहतूक सर्व्हिस रोडने वळवण्यात आली आहे. मात्र, खराब रस्ते आणि खड्ड्यांमुळे वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. तरीही, ही कामे पूर्ण झाल्यानंतर अपघातांचे प्रमाण कमी होऊन प्रवास अधिक सुरक्षित होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## संक्षिप्त

### माथाडीच्या नावाखाली खंडणीची मागणी

**पिंपरी, ता. २८ :** बांधकाम साईटवर स्टील उतरवण्याचे काम करणाऱ्या कामगारांना आम्ही रेकॉर्डवरचे गुन्हेगार आहोत. आम्ही रावेत परिसरात माथाडी करतो, अशी धमकी देत खंडणी मागणाऱ्या तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. ही घटना सोमवारी सकाळी साडेअकरा वाजता रावेत येथे घडली. या प्रकरणी ३६ वर्षीय व्यक्तीने रावेत पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी कासीम मौला मुर्शद (२७, निगडी), अविनाश अर्जुन नाटेकर (२४, निगडी) आणि अनिस खाजाहुसेन शेख (२८, चिंचवड) या तिघांना अटक केली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आणि त्यांचे सहकारी गाडीतून स्टील खाली करत असताना आरोपी तिथे आले. त्यांनी आम्ही रेकॉर्डवरचे गुन्हेगार आहोत. आम्ही रावेत परिसरात माथाडी करतो, असे सांगून कामाच्या मोबदल्यात पैशांची मागणी केली. आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. आरोपी कासीम याने हातातील लोखंडी धारदार हत्यार दाखवून ३० टन स्टीलचे १०० रुपये प्रति टन याप्रमाणे तीन हजार रुपयांच्या खंडणीची मागणी केली.

### टास्क पूर्ण करण्याच्या आमिषाने महिलेची नऊ लाखांची फसवणूक

**पिंपरी, ता. २८ :** टेलिग्राम ग्रुपच्या माध्यमातून गुंतवणुकीवर मोठ्या नफ्याचे आमिष दाखवून एका महिलेला ९ लाख ८५ हजार रुपयांना गंडवल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना ६ जानेवारी ते ९ जानेवारी २०२६ दरम्यान पिंपरी येथे घडली. या प्रकरणात एका ४३ वर्षीय महिलेने संत तुकाराम नगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी फिर्यादीचा नंबर एका व्हॉट्सप ग्रुपमध्ये ड करून त्यांना वेगवेगळ्या लिंक पाठवल्या. त्यानंतर त्यांना दोन टेलिग्राम ग्रुपमध्ये सामील करून घेण्यात आले. तिथे इतर लोकांना झालेल्या नफ्याचे फोटो दाखवून फिर्यादीचा विश्वास संपादन केला. दरम्यान,आरोपींनी फिर्यादीला काही टास्क दिले आणि ते पूर्ण करण्यासाठी वेळोवेळी ९ लाख ८५ हजार ६४० रुपये ऑनलाईन भरण्यास सांगून त्यांची फसवणूक केली.

### घरगुती भांडणात मध्यस्थी केल्याच्या रागातून तरुणाला बेदम मारहाण

**चाकण, ता. २८ :** नातेवाईकांच्या घरातील भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या एका व्यक्तीला तिघांनी मिळून लाकडी दांडकेआणि पाईपने मारहाण करून जखमी केले. ही घटना रविवारी रात्री साडेअकरा वाजता पगडे वस्ती, चऱ्होली खुर्द (ता. खेड) येथे घडली. या प्रकरणी हारून इमामउल्ला शहा (३६, सोळू खिंड, मरकळ) यांनी आळंदी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी आझादसिंह ध्यानसिंह संधू (३३), अमनदीप सत्यपाल सिंह संधू (२२) आणि सिमरनमीत सत्यपाल सिंह संधू (सर्व राहणार माऊली नगर, चऱ्होली खुर्द) या तिघांना अटक केली आहे.

# महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी देणाऱ्या अजित पवारांचा राजकीय प्रवास

**पुणे, ता. २८ :** अहमदनगर जिल्ह्यातील देवळाली येथे २२ जुलै १९५९रोजीजन्मलेल्याअजितदादांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात१९८२ मध्ये सहकारी संस्थांम धून केली. छत्रपती सहकारी साखर कारखान्याच्या संचालक पदापासून सुरू झालेला हा प्रवास राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदापर्यंत पोहोचला.

**महत्त्वाचे टप्पे**

सुरुवात (१९८२ - १९९१) : सहकारी संस्था आणि साखर कारखान्यांच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागातील पकड मजबूत केली. १९९१ मध्ये ते पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष झाले, जे पद त्यांनी पुढे १६ वर्षे सांभाळले.

**खासदार ते आमदार (१९९१) :** १९९५, १९९९, २००४, २००९, २०१४, २०१९, २०२४ असे सलग ७ वेळा ते विधानसभेवर आमदार म्हणून निवडून आले. पहिल्यांदा निवडून आल्यापासून मृत्यूपर्यंत त्यांनी बारामती मतदारसंघावर एकहाती वर्चस्व राखले.

**मंत्रीपदाची कारकीर्द :** कृषी, ऊर्जा, जलसंपदा (पाटबंधारे), ग्रामीण विकास आणि अर्थ यांसारखी महत्त्वाची खाती सांभाळली. 'प्रशासनावर पकड असलेला नेता' म्हणून त्यांची ख्याती तिथेच निर्माण झाली. अजित पवार हे महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्री होणारे एकमेव नेते होते. त्यांनी वेगवेगळ्या युती



आणि आघाड्यांच्या सरकारमध्ये ही जबाबदारी पार पाडली.

अजित पवारांच्या कारकिर्दीत दोन मोठे प्रसंग चर्चेत राहिले : १. देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत पहाटेचा शपथविधी. २. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फुट पाडून महायुती सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय. यानंतर निवडणूक आयोगाने 'राष्ट्रवादी' नाव आणि चिन्ह (घड्याळ) दिले होते.

हो तर हो, नाही तर नाही अजितदादांचा वक्तशीरपणा आणि फाईल निकाली काढण्याची पद्धत प्रशासनात आजही आदर्श मानली जाते. काम होणार असेल तर समोरच्याला हो म्हणायचे आणि नसेल तर तोंडावर नाही म्हणायचे, ही त्यांची शैली कार्यकर्त्यांना प्रचंड आवडायची. पहाटे ६ वाजता काम ाला सुरुवात करणाऱ्या या नेत्याने महाराष्ट्रातील सिंचन आणि पायाभूत सुविधांच्या कामांना मोठी गती दिली.

**बारामतीतील विमान अपघातात मृत्यू**

अजित पवार हे बारामती मध्ये आयोजित जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचार सभांसाठी मुंबईहून निघाले होते. सकाळी ८:१० च्या सुमारास त्यांनी मुंबईतून उड्डाण केले होते आणि ८:५० पर्यंत ते बारामतीला पोहोचणे अपेक्षित होते. मात्र, गोजुबावी परिसरात लँडिंग करत असताना व्हीएसआर कंपनीच्या या खाजगी विमानाचा ताबा सुटला आणि ते जमिनीवर कोसळले. अपघात इतका भीषण होता की विमानाने तातडीने पेट घेतला आणि त्याचे अवशेष दूरवर विखुरले गेले. या अपघातामध्ये अजित पवार यांच्यासह विमानातील सुरक्षा रक्षक विदीप जाधव, पायलट कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन शांभवी पाठक आणि फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली असून राज्याच्या राजकीय वर्तुळात मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

# अजित दादांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या विकासाचा झंझावात शांत

## कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर यांची शोकसंवेदना

**मुंबई, ता. २८ :** राज्याचे उपमुख्यमंत्री आणि महाराष्ट्राचे लोकप्रिय नेते आदरणीय अजितदादा पवार यांचे विमान अपघातात झालेले निधन ही वार्ता मन सुन्न करणारी आहे. नियतीने आपल्या सर्वांवर हा अत्यंत क्रूर आघात केला आहे. अजितदादांचे जाणे ही केवळ एका पक्षाची किंवा कुटुंबाची हानी नसून, संपूर्ण महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाचे मोठे नुकसान आहे. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या विकासाचा झंझावात शांत झाला आहे, अशा शब्दात कामगार मंत्री ॲड आकाश फुंडकर यांनी व्यक्त केल्या आहे.

शोक संदेशात कामगार मंत्री म्हणाले, अजितदादा म्हणजे काम ाचा प्रचंड उरक आणि प्रशासनावर



दरारा असलेले व्यक्तिमत्त्व. शब्दाला पक्का नेता ही त्यांची ओळख संपूर्ण राज्याला होती. पहाटेपासून कामाला सुरुवात करणारा आणि रात्री उशिरापर्यंत जनसामान्यांची कामे मार्गी लावणारा लोकनेता आपण गमविला आहे. राज्याचे अर्थमंत्री आणि उपमुख्यमंत्री म्हणून त्यांनी घेतलेले धाडसी निर्णय महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी मैलाचा दगड ठरले आहेत.

मी कामगार मंत्री म्हणून काम करत असताना, अनेकदा त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा झाली. प्रशासकीय कामातली त्यांची स्पष्टता आणि वेळेचे नियोजन नेहमीच थक्क करणारे असायचे. कामात कसलीही दिरंगाई त्यांना खपत नसे. त्यांच्या या कार्यपद्धतीमुळेच राज्याच्या विकासकामांना नेहमी गती मिळाली. संपूर्ण राज्याला विकासाची नवी दृष्टी देणारे दादा आपल्यात नाहीत, यावर विश्वास ठेवणे कठीण होत आहे. महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर त्यांची उणीव सदैव भासत राहील.

मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती प्रदान करो आणि पवार कुटुंबीय तसेच त्यांच्या लाखो समर्थकांना हे अतीव दुःख सहन करण्याची शक्ती देवो, हीच प्रार्थना, असेही कामगार मंत्री श्री. फुंडकर यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटले आहे.

# पुण्यात घर घेण्याची सुवर्ण संधी

**पुणे, ता. २८ :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या घरांच्या लॉटरीची प्रतीक्षा करणाऱ्या नागरिकांसाठी एक दिलासादायक बातमी समोर आली आहे. तांत्रिक अडथळे आणि कागदपत्रांची जुळवाजुळव करताना उडालेली धांदल लक्षात घेऊन, प्रशासनाने ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत आता २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत वाढवली आहे. या निर्णयामुळे शेकडो मध्यम वर्गीय कुटुंबांना आपल्या हक्काचे घर मिळवण्याच्या शर्यतीत पुन्हा एकदा स्थान मिळवता येणार आहे.

पीएमआरडीएने पिंपरी-चिंचवडमधील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या दोन महत्त्वाच्या प्रकल्पांम धील ८३३ शिल्लक सदनिकांसाठी ही सोडत काढली आहे:

पेठ क्र. १२ : ३४० सदनिका

पेठ क्र. ३० -३२ : ४९३ सदनिका

या सोडतीची जाहिरात डिसेंबर मध्ये प्रसिद्ध झाली होती, मात्र अर्ज



भरण्याची मुदत २७ जानेवारीला संपणार होती. ही मुदत आता सुमारे तीन आठवड्यांनी वाढवण्यात आली आहे.

केवळ 'नियम' म्हणून नाही, तर सर्वसामान्यांच्या अडचणींचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. अर्ज भरताना अनेक नागरिकांना पोर्टलवर तांत्रिक अडचणी येत होत्या. तसेच, उत्पन्नाचे दाखले किंवा गृहप्रकल्पाशी संबंधित विशेष कागदपत्रे वेळेत मिळत नसल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे आल्या होत्या. कोणीही पात्र नागरिक केवळ वेळेअभावी संधीपासून वंचित राहू नये, या भूमिकेतून सहआयुक्त पूनम मेहता यांनी ही मुदतवाढ जाहीर केली आहे.

# अजित पवारांच्या योगदानाची कायम आठवण राहील : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू

**पुणे, ता. २८ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्याने महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. अजित पवार यांची अपघातात अशी अकाली एक्झिट मनाला चटका लावणारी आहे. नवीन वर्षांच्या सुरुवातीच्या महिन्यातच या दुःखद बातमीने महाराष्ट्र हादरला आहे.



संपूर्ण बारामती सुन्न झाली असून मोठ्या प्रमाणात लोकांनी गर्दी केली आहे. अनेक राजकीय मंडळींना अश्रु अनावर झाले आहेत. अनेकांनी या घटनेबाबत दुःख व्यक्त केले असून देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. या अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत वेदनादायक असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

अजित पवार यांचे अकाली निधन ही अपूरणीय हानी असून महाराष्ट्राच्या विकासात, विशेषतः सहकारी क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी त्यांची कायम आठवण राहील, असे त्यांनी नमूद केले आहे. राष्ट्रपतींनी पवार कुटुंबीयांसह समर्थक आणि चाहत्यांप्रती शोकसंवेदना व्यक्त करत या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या सर्वांच्या कुटुंबीयांना या आघाताला सामोरे जाण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना केली आहे.

**पंतप्रधान मोदी यांचे ट्वीट :** पंतप्रधान मोदी यांनी ट्वीट करत लिहिले की, अजित पवार हे जनतेचे नेते होते, त्यांचे तळागाळातील लोकांशी मजबूत संबंध होते. म हाराष्ट्राच्या जनतेची सेवा करण्यात आघाडीवर असलेले कष्टाळू व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा सर्वत्र आदर केला जात असे. प्रशासकीय बाबींबद्दलची त्यांची समज आणि गरीब आणि दलितांना सक्षम बनवण्याची त्यांची आवड देखील उल्लेखनीय होती. त्यांचे अकाली निधन खूप धक्कादायक आणि दुःखद आहे. त्यांच्या कुटुंबियांना आणि असंख्य चाहत्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो. ओम शांती.

# पुण्यात १० बांगलादेशी घुसखोरांना अटक

**पुणे, ता. २८ :** पुणे शहरातील बुधवार पेठ परिसरात वैध कागदपत्रांशिवाय वास्तव्यास असलेल्या दहा परदेशी नागरिकांना पुणे पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली असून या घटनेमुळे शहरातील सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्थेबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. संबंधित व्यक्ती अनेक दिवसांपासून या भागात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

पोलिसांनी मिळालेल्या माहितीची खातरजमा केल्यानंतर लक्ष्यित पद्धतीने छापा टाकण्याचा निर्णय घेतला. या कारवाईत दहा पुरुष आणि महिलांना ताब्यात घेण्यात आले. तपासादरम्यान त्यांच्याकडे भारतात राहण्यासाठी आवश्यक असलेले वैध कागदपत्रे नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच प्राथमिक चौकशीत ते बेकायदेशीररित्या सीमा ओलांडून भारतात आल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.




ही कारवाई पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक आणि कर्मचाऱ्यांच्या विशेष पथकाने ही मोहीम राबवली. छाप्यादरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी परिसरात बंदोबस्त ठेवण्यात आला होता. कारवाई शांततेत पार पडली असून स्थानिक नागरिकांमध्ये कोणतीही घबराट निर्माण झाली नाही.

पोलिसांच्या माहितीनुसार, ताब्यात घेतलेल्या व्यक्तींकडे बांगलादेशी नागरिकत्वाशी संबंधित काही पुरावे आढळून आले आहेत. या आधारे पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. संबंधित यंत्रणांशी संपर्क साधून त्यांच्या देशात परत पाठवण्याबाबतही कार्यवाही केली जाणार आहे.

शहरात बेकायदेशीरपणे वास्तव्यास असलेल्या व्यक्तींवर कारवाई करण्याचा पोलिसांचा हा प्रयत्न असून भविष्यातही अशा प्रकारच्या मोहिमा सुरू राहणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. नागरिकांनी संशयास्पद हालचाली आढळल्यास पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# जलकेंद्राच्या दुरुस्तीमुळे पुण्यात आज पाणीपुरवठा बंद

**पुणे, ता. २८ :** पुणेकरांनी पुढील दोन दिवस पाण्याचा वापर जपून करावा लागणार आहे. पुणे महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रांम ध्ये विद्युत आणि स्थापत्यविषयक देखभाल-दुरुस्तीची महत्त्वाची कामे हाती घेण्यात आल्यामुळे बुधवारी २९ जानेवारी रोजी शहराच्या बहुतांश भागात पाणीपुरवठा पूर्णपणे बंद राहणार आहे. महापालिकेने याबाबत आधीच सूचना देत नागरिकांना आवश्यक तेवढा पाणीसाठा करून ठेवण्याचे आवाहन केले असून, होणाऱ्या गैरसोयीबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे.

महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागानुसार, ही कामे टाळता न येणारी असून पाणीपुरवठा व्यवस्था सुरक्षित आणि सुरळीत ठेवण्यासाठी ती करणे आवश्यक



आहे. जलशुद्धीकरण केंद्रांतील यंत्रणा, विद्युत उपकरणे आणि काही संरचनांची दुरुस्ती व तपासणी केली जाणार आहे. यामुळे भामा आसखेड धरणावरून पाणीपुरवठा होणारा भाग वगळता उर्वरित संपूर्ण पुणे शहरात पाणीपुरवठा ठप्प राहणार आहे.

याचा थेट परिणाम मध्यवर्ती पुणे, पेठा, कोथरूड, वारजे, बावधन, बाणेर, पाषाण, औंध, शिवाजीनगर, डेक्कन, स्टेशन परिसर, तसेच पूर्व आणि दक्षिण पुण्यातील अनेक वस्ती, सोसायट्या आणि गावठाण भागांवर होणार आहे. घरगुती वापरासोबतच लहान व्यावसायिक आस्थापना, रुग्णालये, शाळा आणि वसतिगृहांनाही या बंदचा फटका बसणार आहे.

महापालिकेने स्पष्ट केले आहे की गुरुवारी ३० जानेवारी रोजी सकाळी पाणीपुरवठा पुन्हा सुरू केला जाईल, मात्र सुरुवातीला पाणी उशिरा आणि कमी दाबाने येण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी त्या दिवशीही पाण्याचा वापर काळजीपूर्वक करावा, असा सल्ला देण्यात आला आहे.

सध्या उन्हाळ्याची चाहूल लागलेली असताना आणि पाण्याची मागणी वाढत असताना हा बंद महत्त्वाचा ठरतो. वेळेवर पाणीसाठा करणे, अनावश्यक वापर टाळणे आणि शेजाऱ्यांशी समन्वय ठेवणे, हे पुढील दोन दिवस पुणेकरांसाठी अत्यावश्यक ठरणार आहे.

# करमाळ्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे चित्र झाले स्पष्ट

**सागर घरत**

करमाळा, ता. २८ : करमाळा तालुक्यात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांचे अंतिम चित्र उमेदवारी माघारीनंतर स्पष्ट झाले आहे. जिल्हा परिषदेच्या सहा जागांसाठी एकूण २० उमेदवार, तर पंचायत समितीच्या १२ जागांसाठी ४६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. उमेदवारी माघारीच्या शेवटच्या दिवशी जिल्हा परिषदेचे ३४ आणि पंचायत समितीचे तब्बल १०२ उमेदवारांनी माघार घेतल्याने अनेक ठिकाणी थेट दुरंगी लढती निश्चित झाल्या आहेत.

राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनी मोठ्या प्रमाणात माघार घेतल्यामुळे निवडणूक अधिक चुरशीची होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) गटातील कोर्टी गटाच्या उमेदवार सवितादेवी राजेभोसले, वीट गटाच्या उमेदवार ऋतुजा शिंदे तसेच केतूर व चिकलठाण या पंचायत समिती गणातील उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली आहे.




या निवडणुकीत माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा महिला प्रदेश उपाध्यक्ष रश्मी बागल व जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पार्टी, शिवसेना जिल्हाप्रमुख महेश चिवटे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना, जिल्हा सरचिटणीस संतोष वारे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार), रासपचे जिल्हा सरचिटणीस अंगद देवकते यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय समाज पक्ष, तर विद्यमान आमदार नारायण पाटील यांच्या नेतृत्वाखाली करमाळा तालुका विकास आघाडी निवडणूक लढवत आहे.

जिल्हा परिषदच्या कोर्टी गटात वनिता गुळवे विरुद्ध योगिनी राजेभोसले, तर वांगी गटात मीनाक्षी देशमुख विरुद्ध रूपाली गोडसे यांच्यात थेट दुरंगी लढत होणार आहे. तसेच पंचायत समितीच्या जेऊर, उमरड व चिकलठाण या गणांमध्ये प्रत्येकी दोनच उमेदवार शिल्लक राहिल्याने तेथेही सरळ दुरंगी लढती निश्चित झाल्या आहेत.

दरम्यान, थेट लढतींमुळे प्रचाराचा जोर वाढला असून सर्वच राजकीय पक्ष व आघाड्यांकडून मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. आगामी काही दिवसांत प्रचार अधिक रंगणार असल्याचे चित्र आहे.

# समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात रंगले शिक्षक-विद्यार्थी कवी संमेलन

**लोणी काळभोर, ता. २८ :** मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने मंगळवारी (ता. २७) शिक्षक- विद्यार्थी कवी संमेलन पार पडले. शिक्षक व विद्यार्थी कवी सहभागी झालेल्या या संमेलनात विद्यार्थी व शिक्षकाचे प्रतिनिधीक स्वरूपात प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर यांच्या हस्ते गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

शिक्षक- विद्यार्थी कवी संमेलनाची सुरवात पाटा केंज्ञा ( गाणे ऐका ) या काव्यसंग्रहाचे कवी डॉ. शिवाजी गायकवाड यांनी माय मराठी ओवी, मावळा मर्द मराठी




अशा स्वरचित कविता सादरीकरणाने केली. याबरोबरच शिक्षक कवी मध्ये डॉ. विजयकुमार घोडके, डॉ. शेखर पाटील, प्रा.डॉ. विवेकानंद टाकळीकर, प्रा. स्नेहा हिंगमिरे, प्रा. गीतांजली चव्हाण, प्रा. गणेश गाडेकर, प्रा. ज्योती कांबळे, डॉ. स्नेहा बुरगुल, प्रा. गणेश हजारे, शंकरराव चव्हाण, विद्यार्थ्यांमध्ये सुमित्रा गुरव(ही मायभूमी), पायल जाधव (देवाक काळीज रं), मदिहा सय्यद (ज्ञानाची माऊली), जान्हवी पवार, (मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा) प्रणाली खाटमोरे, लवांडे तृप्ती, संजीवनी कोळेकर, यश लोंढे आदींनी अनेक कवींच्या प्रसिद्ध कविता सादर केल्या. हे कवी संमेलन विद्यार्थी- शिक्षकाचे असल्याने उत्स्फुर्तपणे आपापल्या कविता सादर केल्या. विद्यार्थ्यांनी रसिक मनाने कवितांचा मनमुराद आस्वाद घेतला.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर म्हणाले की, मराठी भाषेचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे महाविद्यालयात दिनांक १४ ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. याम ध्ये सुंदर हस्ताक्षर स्पर्धा, शुद्धलेखन स्पर्धा, चारोळी लेखन, अभिवाचन, कवी संमेलन, प्रश्न मंजुषा इत्यादी उपक्रम घेण्यात आले.

दरम्यान, विविध उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आपल्यातील सुप्त गणांना वाव द्यावे. महाविद्यालयीन जीवन अशा उपक्रमातूनच घडत असते. सर्जनशील लेखणी आणि मनाला चालना देण्यासाठी असे उपक्रम राबविले जाते. त्यात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. असे आवाहन मंजुळकर यांनी केले

दरम्यान, या कवी संमेलनाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा.विजयकुमार घोडके यांनी केले. या कार्यक्रम ाचे सूत्रसंचालन डॉ. शिवाजी गायकवाड यांनी तर आभार प्रा. मुकेश महाले यांनी मानले. सदर कवी संमेलनाचा समारोप डॉ. संभाजी निकम यांनी केला.

# सोरतापवाडी येथील दीप्ती मगर आत्महत्या प्रकरणात पतीसह सरपंच सासूला अटक



**पुणे, ता. २८ :** पुणे जिल्ह्यातील सोरतापवाडी येथील दीप्ती चौधरी आत्महत्येच्या प्रकरणाने पुन्हा एकदा सासरच्या छळाचा गंभीर प्रश्न ऐरणीवर आला आहे. २४ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास दीप्ती रोहन चौधरी, वय ३० वर्षे, हिने कडवस्ती, सोरतापवाडी येथील आपल्या राहत्या घरी गळफास घेऊन आयुष्य संपवले. या घटनेनंतर तिची आई हेमलता मगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उरुळी कांचन पोलिसांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

दीप्तीला विवाहानंतर सासरकडून सातत्याने मानसिक त्रास दिला जात होता, तसेच माहेरहून वारंवार पैसे आणण्याचा दबाव टाकला जात असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या सततच्या जाचाला कंटाळूनच दीप्तीने टोकाचे पाऊल उचलल्याचा कुटुंबीयांचा दावा आहे. या प्रकरणात पती रोहन चौधरी, सासू सुनिता चौधरी, सासरे कारभारी चौधरी आणि दीर रोहित चौधरी यांच्याविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या प्रकरणातील आरोपी सासू सुनिता चौधरी या सोरतापवाडी गावच्या विद्यमान सरपंच आहेत. त्यामुळे स्थानिक पातळीवर तीव्र प्रतिक्रिया उमटत असून, प्रशासनावर निष्पक्ष कारवाईचा दबाव वाढला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून आवश्यक भौतिक पुरावे जप्त केले असून तपास सुरू आहे.

या प्रकरणात २६ जानेवारी रोजी पहाटे पती रोहन चौधरी याला अटक करण्यात आली, तर त्याच दिवशी दुपारी सासू सुनिता चौधरी यांनाही अटक करण्यात आली. न्यायालयाने दोघांना ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. उर्वरित आरोपींचा शोध सुरू असून स्वतंत्र पथकेत्यासाठी कार्यरत आहेत.

# कुंजीरवाडी येथून डॉक्टरांचे अपहरण करून मागितली खंडणी; चालकासह चार आरोपींना अटक

**पुणे, ता. २८ :** डॉक्टरला चाकूचा धाक दाखवून लुटल्याची घटना लोणी काळभोर परिसरातून उघडकीस आली आहे. कुंजीरवाडी येथील एका ५८ वर्षीय नामांकित डॉक्टरच्या अपहरणाचे गूढ उकलले असून, यात धक्कादायक माहिती समोर आली असून डॉक्टरांचा सर्वात विश्वासू चालकच या संपूर्ण गुन्ह्याचा 'मास्टरमाइंड' निघाला आहे.

राजेंद्र छगन राजगुरु (वय ३२, रा. अनंतपूर, पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर), संतोष सोमनाथ बनकर (वय ३६, रा. अनंतपूर, पैठण), दत्ता ऊर्फ गोटू बाळु आहेर (वय ३४, रा. अनंतपूर, पैठण) आणि सुनील ऊर्फ सोनू मुरलीधर मगर (वय ३०, रा. गणेशनगर, गारखेडा परिसर, जि. छत्रपती संभाजीनगर) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. डॉ. विठ्ठल किसन चौधरी (वय ५८ , रा. कुंजीरवाडी) असे अपहरण झालेल्या डॉक्टरचे नाव आहे.

डॉ. विठ्ठल चौधरी हे १० जानेवारी रोजी रात्री सव्वादहा वाजता सोलापूरपुणे महामार्गावरून ऊरुळी कांचनकडून कुंजीरवाडीकडे कारमधून जात होते. त्यावेळी राजेंद्र छगन राजगुरु हे कार चालवीत होते. उरुळी कांचनहून आपल्या घराकडे परतत असताना सोलापूर-पुणे म हामार्गावर एका निर्जन ठिकाणी चार जणांनी त्यांची कार अडवली. गाडीत घुसलेल्या टोळीने डॉक्टरांच्या मानेला चाकू लावून त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. काही तास दहशतीच्या छायेत ठेवल्यानंतर, डॉक्टरांकडून



तब्बल १९ लाख रुपयांची खंडणी उकळून त्यांना सोडून देण्यात आले.

सुरुवातीला हा गुन्हा एखाद्या सराईत टोळीचा वाटत होता, मात्र तपासादरम्यान पोलिसांना एक महत्त्वाची कडी सापडली. गुन्हेगारांना डॉक्टरांच्या प्रवासाची, त्यांच्याकडे असलेल्या रकमेची आणि नेमक्या लोकेशनची इतकी अचूक माहिती कशी मिळाली? याच संशयातून पोलिसांनी डॉक्टरांचा चालक राजेंद्र छगन राजगुरू याचे कॉल रेकॉर्ड्स तपासले.

तपासात समोर आले की, राजेंद्र मागील अनेक दिवसांपासून सराईत गुन्हेगारांच्या संपर्कात होता. त्यानेच डॉक्टरांच्या प्रत्येक हालचालीची माहिती आपल्या साथीदारांना पुरवली होती. ज्या चालकाला डॉक्टर मुलाप्रमाणे समजत होते. त्यानेच हा कट रचल्याचे कळल्यावर अनेकांना धक्का बसला आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी बापूराव दडस यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, पोलीस निरीक्षक सचिन वांगडे, सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजीगरे, पोलीस उपनिरीक्षक अमित सिदपाटील, पोलीस अंमलदार सचिन घाडगे, अजित भुजबळ, आसिफ शेख, राजू मोमीन, योगेश नागरगोजे, धीरज जाधव, अजित काळे, प्रविण चौधर, निलेश जाधव, प्रशांत पवार, विशाल रासकर, सुमित वाघ, दीपक यादव, अमोल राऊत यांनी केली.

# पुण्यातील कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग परिसरात अधिकाऱ्याचं घर चोरट्यांनी फोडलं

**पुणे, ता. २४ :** पुण्यातील अत्यंत सुरक्षित मानल्या जाणाऱ्या कॉलेज ऑफ मिलिटरी इंजिनिअरिंग परिसरात घरफोडीची घटना उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. संरक्षण दलाशी संबंधित अधिकारी आणि कर्मचारी वास्तव्यास असलेल्या या हाय-सिक्युरिटी कॅम्पसमध्ये हवाई दलातील एका अधिकाऱ्याच्या घरातून लाखो रुपयांचा ऐवज चोरीला गेल्याने सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



दापोडी येथील सीएमई कॅम्पसम ध्ये वास्तव्यास असलेले भारतीय हवाई दलातील अधिकारी मुकेशकुम ार सुधेश्वर सिंग, वय ४३, हे रविवारी सायंकाळी आपल्या कुटुंबासह चित्रपट पाहण्यासाठी बाहेर गेले होते. सुट्टीचा दिवस असल्याने सायंकाळी सुमारे ६ वाजता त्यांनी घराला कुलूप लावले आणि बॉर्डर २ हा सिनेमा पाहण्यासाठी गेले. रात्री अंदाजे ११ वाजता घरी परतल्यानंतर त्यांना मुख्य दरवाजाचा कडी-कोयंडा तुटलेला दिसला. घरात प्रवेश केल्यानंतर कपाट उघडे असून मौल्यवान दागिने गायब असल्याचे त्यांच्या लक्षात आले.

चोरट्यांनी कपाटातील सोन्याचा हार, चैन, अंगठी, मंगळसूत्र आणि ब्रेसलेट असा एकूण ४ लाख ४० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची माहिती फिर्यादीत नमूद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, लष्करी संस्थेच्या अत्यंत नियंत्रित आणि सुरक्षित मानल्या जाणाऱ्या परिसरात ही चोरी कोणाच्याही लक्षात न येता कशी घडली, हा प्रश्न निर्माण झाला आहे. या प्रकरणी मुकेशकुमार सिंग यांनी दापोडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिसांकडून सीएमई कॅम्पसमधील आणि आसपासच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले जात आहे. तसेच, प्रवेशद्वारांवरील नोंदी, सुरक्षा रक्षकांची ड्युटी आणि बाहेरून कोणाला प्रवेश मिळाला का, याचाही तपास सुरू आहे.

# अमृता फडणवीसांवर आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या अंजली भारतींविरुद्ध कारवाईचे आदेश!

**नागपूर, ता. २८ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांच्याबद्दल गायिका अंजली भारती यांनी केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले आहे. भंडारा जिल्ह्यातील फुलमोगरा येथे आयोजित भीम मेळाव्यात केलेल्या या विधानाचा सत्ताधारी आणि विरोधक अशा दोन्ही बाजूंनी तीव्र निषेध करण्यात येत आहे. महिलांचा सन्मान, अभिव्यक्तीची मर्यादा आणि सार्वजनिक कार्यक्रम ांतील जबाबदारी या मुद्द्यांवर पुन्हा एकदा गंभीर चर्चा सुरू झाली आहे.

या प्रकरणाची राज्य महिला आयोगाने तातडीने दखल घेतली आहे. आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी भंडारा जिल्हा पोलीस



अधीक्षक आणि जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून संबंधित वक्तव्य आणि त्याची चित्रफीत तपासून कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. चाकणकर यांनी सांगितले की, संविधान प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा आणि काम करण्याचा अधिकार देते. कोणावरही अतिशय खालच्या पातळीवर जाऊन वैयक्तिक टीका करणे हे चुकीचे असून अशा प्रकारच्या वक्तव्यांवर कायद्याच्या चौकटीतून कारवाई केली जाईल.

दरम्यान, अंजली भारती यांच्या वक्तव्याचा निषेध करत भाजप महिला आघाडीने नागपूरचे पोलीस आयुक्त यांना निवेदन दिले आहे. मोठ्या संख्येने महिला कार्यकर्त्या पोलीस आयुक्त कार्यालयात दाखल झाल्या होत्या. या वक्तव्यामुळे महिलांचा अपमान झाला असून समाजात तेढ निर्माण होण्याची शक्यता असल्याचा आरोप महिला आघाडीने केला आहे. तसेच अंजली भारती यांच्यावर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याच पार्श्वभूमीवर १ फेब्रुवारी रोजी नागपुरात अंजली भारती यांचा नियोजित कार्यक्रम रद्द करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. पोलीस प्रशासनाने परवानगी दिल्यास तो कार्यक्रम होऊ देणार नाही, असा इशाराही महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी तातडीने योग्य पावले उचलावीत, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

पुणे प्राईम न्यूज — जनमानसाचा निडर आवाज...
http://www.puneprimenews.com

प्राईम लाईफ



## आपल्या आहारात बार्ली समाविष्ट करण्याचे काय फायदे होतात

बार्लीला (सत्तुला) धान्यांचा राजा मानलेले आहे. बार्लीमध्ये प्रथिने, कार्बोहायड्रेट्ससह कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम आणि फॉस्फरससारखे अनेक पोषक घटक आढळतात. याशिवाय व्हिटॅमिन सी, थायामिन, रिबोफ्लेविन आणि नियासिन सारखे घटक देखील त्यात आढळतात. नियमित बार्लीचे (सत्तुचे) सेवन केल्याने अनेक आजार दूर राहण्यास मदत होते.

तथापि, आजही लोक त्यांच्या आहारात बार्ली कशी समाविष्ट करावी याबद्दल गोंधळलेले आहेत. आहारात सत्तुपासुन आपण विविध पदार्थ बनवु शकतो. मुख्य म्हणजे बार्लीचा पुलाव हा एक सर्वात उत्तम पर्याय आहे. बार्ली पुलावची रेसिपी ही सर्वात उत्तम रेसिपी असून, रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी हा एक उत्तम उपाय आहे.

बार्ली पुलाव खाण्याचे फायदे : बार्लीमध्ये बीटा-ग्लुकन असते. यामुळे वाढलेले कोलेस्ट्रॉल नियंत्रित करण्यास मदत होते. कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रणात राहते तेव्हा रक्तदाबाची समस्या येत नाही. यामुळे हृदयाशी संबंधित समस्या दूर राहण्यास मदत होते.

बार्लीमध्ये फायबर आढळते. फायबर भूक नियंत्रित करण्यास मदत करते, ज्यामुळे वजन कमी होण्यास मदत होते. याव्यतिरिक्त, ते बीटा-ग्लुकन, टॉकोल्स, प्रतिरोधक स्टार्च, आहारातील फायबरचा चांगला स्रोत आहे, ज्यामुळे ते भूक नियंत्रित करण्यास उपयुक्त मानले जाते.

बार्लीमध्ये फॉस्फोरिक ॲसिड, सॅलिसिलिक ॲसिड आणि लॅक्टिक लॅक्टिक ॲसिड असते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की बार्लीचे नियमित सेवन केल्याने पोटदुखी, बद्धकोष्ठता, गॅस आणि पोटात पेटके यासारख्या पचनाच्या समस्या होत नाहीत. ज्यांना जेवणानंतर गॅस होतो त्यांच्यासाठीही बार्लीचा पुलाव खूप फायदेशीर आहे.

# एक लाखाहून अधिक बहिणींचे पैसे रखडले ऑनलाइन केवायसीने वाढविली डोकेदुखी

**अहिल्यानगर, ता. २८ :** लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवण्यासाठी आवश्यक असलेल्या ऑनलाइन ई-केवायसी प्रक्रियेने अहिल्यानगर जिल्ह्यातही जवळपास एक लाखाहून अधिक महिलांची डोकेदुखी वाढवली आहे. त्यातच जानेवारी महिन्यात अनेक पात्र महिलांना या योजनेत पैसेच मिळाले नाहीत. ई-केवायसी करताना या त्रुटी राहिल्यामुळे या महिलांचे पैसे जमा झाले नसल्याची माहिती आता समोर येऊ लागली आहे.




लाडकी बहीण योजनेचा लाभ अचानक बंद झाल्याने अहिल्यानगरसह राज्यभरात अनेक ठिकाणी महिलांमध्ये संताप व्यक्त होत असताना आता महिला बालकल्याण विभागाने पैसे बंद झालेल्या महिलांच्या खात्यांची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात अशा प्रकारे एक लाखाहून अधिक महिलांचे जानेवारी महिन्याचे पैसे आले नाहीत. पैसे न आलेल्या या महिलांच्या खात्यांची पडताळणी करून त्यांची माहिती महिला बालकल्याण खात्याला सादर करण्यात येणार आहे.

राज्यातील महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी, त्यांच्या आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी सरकारकडून माझी लाडकी बहीण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सर्व लाभार्थ्यांना ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ई-केवायसी करण्याची मुदत देण्यात आली होती. ही ई-केवासी करताना काही कारणास्तव महिलांकडून चुकीचा पर्याय निवडण्याची बाब निदर्शनास आली आहे. म्हणूनच, योजनेच्या निकषांनुसार या लाभार्थी महिलांची क्षेत्रीय स्तरावर अंगणवाडी सेविकांमार्फत प्रत्यक्ष पडताळणी करण्याच्या सूचना राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

जानेवारी महिन्यात लाडकी बहीण योजनेचा हप्ता जमा करण्यात आला. मात्र, अनेक महिलांच्या खात्यात पैसेच जमा झाले नाहीत. त्यामुळे ठिकठिकाणी आता महिला आंदोलन करत आहेत. अर्ज भरताना तांत्रिक प्रश्नांच्या अज्ञानामुळे हजारो पात्र महिलांचे अर्ज फेटाळले गेले आहेत. परिणामी, नियमित हप्ते मिळणाऱ्या अनेक महिलांचा लाभ अचानक बंद झाला आहे.

राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात साधारणपणे २० ते २५ टक्के महिलांकडून ही चूक झालेली असून, आता सरकारच्या आदेशानुसार नगरसह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी हे जानेवारी महिन्याचा लाभ न मिळालेल्या लाडक्या बहिणीच्या बंद असणाऱ्या खात्याची पडताळणी करणार आहेत. त्यानंतर याबाबतचा अहवाल राज्य सरकारच्या महिला बालकल्याण विभागाला सादर करणार आहेत.

### दुरुस्तीचा पर्यायच उपलब्ध नव्हता

ई-केवायसी पूर्ण झाल्यावर त्यात झालेली चूक सुधारण्यासाठी पोर्टलवर कोणताही एडिट किंवा करेक्शनचा पर्याय देण्यात आलेला नव्हता. हीच सर्वात मोठी तांत्रिक अडचण ठरली असून, चुकीच्या माहितीमुळे एकदा अपात्र ठरलेली महिला कायमची लाभापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात सध्या पात्र असणाऱ्या २० ते २५ टक्के महिलांकडून ई-केवायसी करताना चुका झालेल्या आहेत. जानेवारी महिन्याचे पैसे न आल्याने संबंधित महिलांनी सरकारला जाब विचारल्यानंतर ही बाब समोर आली आहे.

# बायकोच्या लाडकी बहीण योजनेच्या पैशांवर पतीने मारला 'डल्ला'

**बुलढाणा, ता. २८ :** बुलढाणा जिल्ह्यातील लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान धक्कादायक प्रकार समोर आला असून, योजनेच्या लाभार्थी महिलेच्या खात्यातून तिच्या परवानगीशिवाय पैसे काढल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. योजनेचा उद्देश महिलांना आर्थिक आधार देण्याचा असताना, या घटनेमुळे लाभार्थी महिलांच्या सुरक्षिततेचा आणि बँकिंग प्रक्रियेतील पारदर्शकतेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मेहकर तालुक्यातील राजगड येथील नेहा विशाल चव्हाण या विवाहित महिलेने या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे. पतीशी झालेल्या वादानंतर ती गेल्या एक वर्षापासून




अकोला जिल्ह्यातील राजनखेडा येथे माहेरी राहत आहे. लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र ठरल्याने तिच्या नावावर दरमहा १,५०० रुपये जमा होत होते. या योजनेसाठी तिने महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या डोणगाव शाखेत बचत खाते उघडले होते आणि त्याच खात्यात योजनेची रक्कम जमा होत होती.

महिलेच्या आरोपानुसार, तिचा पती विशाल चव्हाण दुसऱ्या एका महिलेला सोबत घेऊन बँकेत गेला आणि बनावट सही करून खात्यातून पैसे काढले. पहिल्यांदा २,८०० रुपये आणि त्यानंतर दुसऱ्यांदा ३,००० रुपये असे दोन वेळा एकूण सुमारे ५,८०० रुपये काढण्यात आल्याचा दावा तिने केला आहे. विशेष म्हणजे, दोन्ही वेळा बँक कर्मचाऱ्यांनी खातेदाराची ओळख किंवा स्वाक्षरीची खातरजमा केली नाही, असा आरोपही तिने केला आहे.

या प्रकरणी डोणगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, संबंधित पती आणि बँक अधिकाऱ्यांविरोधात कारवाईची मागणी महिलेने केली आहे. दरम्यान, महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या डोणगाव शाखेचे अधिकारी सचिन गोडे यांनी तपासासाठी बँकेतील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येईल आणि विथड्रॉवल स्लिपवरील स्वाक्षऱ्यांची पडताळणी झाल्यानंतरच स्पष्ट भूमिका मांडता येईल, असे सांगितले आहे.

लाडकी बहीण योजनेचा लाभ थेट महिलांपर्यंत पोहोचावा, हा सरकारचा उद्देश असताना अशा प्रकारांमुळे योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. या प्रकरणातील तपासातून नेमकं सत्य काय समोर येतं आणि जबाबदारी कोणाची ठरते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पारोडी गावच्या उपसरपंचपदी बजरंग सातकर यांची बिनविरोध निवड

अक्षय टेमगिरे



**न्हावरे, ता. २८ :** शिरूर तालुक्यातील पारोडी येथे उपसरपंच पदासाठी निवडणूक प्रक्रिया पार पडली असुन सदर निवडणूक विद्यमान सरपंच तथा अध्यासी अधिकारी वर्षा लाला येळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या निवडणुकीत उपस्थित सदस्यांपैकी बजरंग तात्या सातकर यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने अध्यासी अधिकारी वर्षा लाला येळे व ग्रामपंचायत अधिकारी दत्तात्रय नारायण कुंभार यांनी अर्ज वैध असल्याचे घोषित केले. त्यानंतर दुपारी २ वाजता बजरंग तात्या सातकर यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यापूर्वी ग्रामपंचायत पारोडीच्या उपसरपंचपदी दिपाली गणेश कवितके कार्यरत होत्या. मात्र सर्व सभासदांना संधी मिळावी या हेतूने त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने नवनिर्वाचित उपसरपंच बजरंग तात्या सातकर यांना कामकाजाची संधी प्राप्त झाली आहे.

या निवडप्रक्रियेवेळी सरपंच तथा अध्यासी अधिकारी वर्षा लाला येळे, ग्रामपंचायत अधिकारी दत्तात्रय नारायण कुंभार यांनी कामकाज पाहिले. यावेळी विशाल गव्हाणे, मेजर योगेश टेमगिरे, शशिकांत कोकरे, कविताताई टेमगिरे, माजी सरपंच कमल शिवले, चिंतामण टेमगिरे, लालासो येळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रामपंचायत लिपिक सुशांत टेमगिरे यांनी केले. तर अध्यासी अधिकारी वर्षा लाला येळे यांनी आभार मानत नवनिर्वाचित उपसरपंच बजरंग तात्या सातकर यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.



## मुंबईत स्कूल बसने आजी-नातीला चिरडले

**मुंबई, ता. २८ :** दक्षिण मुंबईतील खेतवाडी परिसरात मंगळवारी दुपारी एक अत्यंत दुःखद अपघात घडला. शाळेतून नातीला घरी घेऊन जाण्यासाठी आलेल्या एका महिलेला स्कूल बसने धडक दिली. या अपघातात महिलेच्या कुशीत असलेल्या ९ महिन्यांच्या बाळाचा बसच्या चाकाखाली चिरडून जागीच मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दुपारी सुमारे १२.२३ वाजता कुलाबा येथील जे. बी. सोमाणी शाळेची बस विद्यार्थ्यांना उतरवत होती. त्या वेळी संबंधित महिला आपल्या नातीला बसमधून उतरवून घेत होती. तिच्या कुशीत लहान बाळ होते आणि नातीचा हात धरून ती रस्ता ओलांडत होती. त्याच क्षणी बस पुढे सरकली आणि महिलेला जोरदार धडक बसली.

धडकेनंतर महिला, बाळ आणि शाळकरी मुलगी रस्त्यावर कोसळल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसते. बसचे पुढील चाक महिलेकडे व बाळाकडे गेल्याने बाळाचा जागीच मृत्यू झाला. महिला आणि मुलगी या दोघींनाही गंभीर दुखापत झाली असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघात होताच स्थानिक नागरिकांनी धाव घेत मदतकार्य केले. घटनेची माहिती मिळताच खेतवाडी पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून स्कूल बस चालकाला ताब्यात घेतले आहे. अपघाताचे नेमकेकारण तपासले जात असून सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चौकशी सुरू आहे.

या अचानक घडलेल्या घटनेमुळे खेतवाडी परिसरात काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. शाळा बस चालकांनी आणि संबंधितांनी अधिक काळजी घ्यावी, तसेच विद्यार्थ्यांना उतरवताना सुरक्षिततेचे सर्व नियम पाळावेत, अशी मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे. या दुर्दैवी घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

## पुण्यातील 'सायको' सिरीयल किलरला अटक

**पुणे, ता. २८ :** पुणे ग्रामीण भागात एकतर्फी प्रेमातून घडलेला दुहेरी खुनाचा धक्कादायक प्रकार उघडकीस आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. आपल्या सोबत मजुरीचे काम करणाऱ्या महिलेवर एकतर्फी प्रेमातून तिचा खून करण्यात आला असून, त्याआधी तिच्यासोबत काम करणाऱ्या आणखी एका तरुणाचाही निर्घृण खून केल्याचे तपासात समोर आले आहे. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

सुपा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील काळखैरेवाडी, खैरेपडळ परिसरात १९ जानेवारी रोजी सकाळी एका महिलेचा मृतदेह आढळून आला होता. तिच्या डोक्यावर गंभीर जखमा होत्या. हा खून उघडकीस




आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा आणि सुपा पोलिसांनी संयुक्तपणे तपास सुरू केला. घटनास्थळ आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले. त्यात संशयित व्यक्तीची हालचाल दिसून आली, तसेच घटनास्थळी मिळालेल्या एका डायरीमुळे तपासाला दिशा मिळाली.

या पुराव्यांच्या आधारे जैतू चिंधू बोरकर या व्यक्तीचा माग काढण्यात आला. चौकशीतून धक्कादायक माहिती समोर आली. जैतू बोरकर याचे रंजना अरुण वाघमारे हिच्यावर एकतर्फी प्रेम होते. ती त्याच्यासोबत राहण्यास नकार देत असल्याने तो तिला सतत त्रास देत होता. १७ जानेवारी रोजी रात्री कोयंडे गावाजवळील डोंगर परिसरात त्याने सुरज अंकुश वाघ याच्या डोक्यात कोयत्याने वार करून खून केला. त्यानंतर रंजनाला जबरदस्तीने घेऊन तो सुपा परिसरात गेला.

दरम्यान, १८ जानेवारी रोजी रात्री रंजनाने पुन्हा एकदा त्याच्यासोबत राहण्यास नकार दिला आणि पोलिसांकडे तक्रार करेल, या भीतीने जैतू बोरकर याने दगडाने तिच्या डोक्यात मारून तिचाही खून केला, असे तपासात निष्पन्न झाले आहे. जैतू बोरकर हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही खुनाचे गुन्हे दाखल आहेत. आतापर्यंत त्याच्यावर एकूण ४ खुनांचे गुन्हे नोंद असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

## पुण्यात पार्किंगवरून दोन कुटुंबात राडा; १५ जणांवर गुन्हा दाखल

**पुणे, ता. २८ :** पार्किंगच्या वादातून सुरू झालेला किरकोळ वाद थेट हिंसाचारात बदलल्याची घटना पुण्यातील बंडगार्डन परिसरात घडली असून, सार्वजनिक जेवणाचा कार्यक्रम सुरू असतानाच दोन गट एकमेकांवर तुटून पडल्याने परिसरात एकच गोंधळ उडाला. या घटनेत महिलांसह अनेक जण जखमी झाले असून, बंडगार्डन पोलिसांनी परस्परविरोधी तक्रारींच्या आधारे एकूण १५ जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. त्यामध्ये ५ महिलांचा समावेश आहे.

ही घटना २५ जानेवारी रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास प्रायव्हेट रोड, ताडीवाला रोड परिसरातील लुंबिनीनगर येथे घडली. एका घरातील सार्वजनिक जेवणाचा कार्यक्रम सुरू असताना




पार्किंगवरून वाद झाला. हा वाद पाहता पाहता इतका चिघळला की दोन्ही बाजूंनी एकमेकांवर खुर्च्या, ताटे, जाळण्यासाठीची लाकडे आणि हत्यारांनी हल्ले करण्यात आले.

एका बाजूने अजय भालशंकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी त्यांच्या भावंडांवर आणि पत्नीवर मारहाण करत गंभीर जखमा केल्या. या झटापटीत दुचाकीचेही नुकसान करण्यात आले. दुसरीकडे, सोनू काळे यांनी दाखल केलेल्या फिर्यादीत भालशंकर कुटुंबातील सदस्यांनी तसेच महिलांनी मिळून मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या झटापटीत काही जणांच्या डोक्याला, डोळ्याजवळ, पाठीवर आणि छातीवर दुखापती झाल्या असून, काहींवर हत्याराने वार झाल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

सार्वजनिक ठिकाणी सुरू असलेल्या जेवणाच्या कार्यक्रमात अचानक झालेल्या या हिंसाचारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. बंडगार्डन परिसरात आधीच दाट वस्ती आणि वाहतुकीचा ताण असताना अशा प्रकारच्या घटना कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करतात, अशी प्रतिक्रिया स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## वाघोलीत जन्मदात्या आईकडून पोटच्या मुलाचा खून

**पुणे, ता, २८ :** पुण्यात आईने आपल्या पोटच्या मुलाची हत्या करून मुलीवर जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर आल्यानंतर संपूर्ण शहर हादरले आहे. ज्या आईच्या कुशीत मूल स्वतःला सर्वाधिक सुरक्षित समजते, त्याच नात्याला काळिमा फासणारा हा प्रकार वाघोलीतील बायफ रोड परिसरात घडला. २७ जानेवारी रोजी पहाटे एका घरातून आलेल्या किंचाळ्यांनी शेजाऱ्यांचे लक्ष वेधले आणि पुढे जे दृश्य समोर आले, त्याने सर्वांनाच धक्का बसला.

घरात ११ वर्षांचा साईराज आणि १३ वर्षांची धनश्री रक्ताच्या थारोळ्यात पडलेले होते. साईराजचा जागीच मृत्यू झाला होता, तर धनश्री गंभीर जखमी अवस्थेत मदतीची याचना करत होती. तिच्या शेजारी आई सोनी संतोष जायभाय हातात रक्ताने माखलेला कोयता घेऊन सुन्न अवस्थेत बसलेली होती. शेजाऱ्यांनी



तातडीने पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचताच साईराजचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले, तर धनश्रीला तात्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. सध्या तिची प्रकृती अत्यंत चिंताजनक असून डॉक्टरांचे पथक तिला वाचवण्यासाठी प्रयत्न करत आहे.

सोनी जायभाय मूळची नांदेड जिल्ह्यातील कंधार येथील रहिवासी असून सध्या ती पोलिसांच्या ताब्यात आहे. शेजाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सोमवार रात्रीपासून घरात जोरदार वाद सुरू होता. मात्र, कौटुंबिक भांडण असावे असा अंदाज बांधून कोणीही हस्तक्षेप केला नव्हता. मंगळवारी पहाटे मात्र परिस्थिती भीषण रूपात समोर आली.

या घटनेमागचे कारण अद्याप अस्पष्ट आहे. पोलिस प्राथमिक तपासात सोनी मानसिक आजाराने ग्रस्त असण्याची शक्यता व्यक्त करत आहेत. मात्र, मुलावर कोयत्याने वार करण्यात आल्याने हा प्रकार अचानक रागातून न होता आधीच ठरवून केला असावा, अशी शक्यताही तपासात समोर येत आहे. घटनेच्या वेळी महिलेचा पती कुठे होता, याबाबतही अद्याप कोणतीही ठोस माहिती मिळालेली नाही. सोनीनेही गुन्ह्याची कबुली किंवा कारण स्पष्ट केलेले नाही.

# प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभासाठी आता नवे निकष

**मुंबई, ता. २८ :** केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत नियमांमध्ये महत्त्वाचे बदल जाहीर केले असून, त्याचा थेट परिणाम घरकुलासाठी अर्ज केलेल्या तसेच पुढील काळात अर्ज करू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांवर होणार आहे. योजनेचा लाभ खऱ्या अर्थाने गरजूंपर्यंत पोहोचावा आणि गैरवापराला आळा बसावा, या उद्देशाने नियम अधिक स्पष्ट व कठोर करण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. विशेषतः ऑगस्ट २०२४ नंतर जमीन खरेदी किंवा नोंदणी केलेल्या अर्जदारांना नव्या मार्गदर्शक तत्त्वांची माहिती घेणे आवश्यक ठरणार आहे.

जमीन मालकीबाबत स्पष्ट अट नव्या निर्णयानुसार, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० मधील लाभार्थी बांधकाम घटकांतर्गत ३१ ऑगस्ट २०२४ पूर्वी स्वतःची जमीन असलेले अर्जदारच पात्र ठरणार आहेत. या तारखेनंतर जमीन खरेदी करणाऱ्या किंवा नोंदणी केलेल्या व्यक्तींना घरबांधणीसाठी दिल्या जाणाऱ्या २.५ लाख रुपयांच्या आर्थिक सहाय्यास अपात्र ठरवण्यात आले आहे. केवळ योजनेचा लाभ मिळवण्यासाठी जमीन खरेदी केल्याचे प्रकार आढळल्याने ही कठोर भूमिका घेण्यात आल्याचे सरकारचे म्हणणे आहे.



### आर्थिक मदत कशी मिळते?

बी एल सी श्रेणीतील पात्र लाभार्थ्यांना घरकुलासाठी एकूण २.५ लाख रुपये दिले जातात. यामध्ये केंद्र सरकारकडून १.५ लाख रुपये आणि राज्य सरकारकडून १ लाख रुपये असा वाटा आहे. काही प्रकरणांमध्ये लाभार्थ्याकडे स्वतःची जमीन उपलब्ध नसेल, तर राज्य सरकार गरजेनुसार जमीन उपलब्ध करून देऊ शकते. योजनेअंतर्गत ३० ते ४५ चौरस मीटर क्षेत्रफळाचे घर बांधण्याची मुभा आहे.

### निवासी क्षेत्रातील जमीन अनिवार्य

नव्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, केवळ जमीन मालकी पुरेशी नसून जमीन निवासी क्षेत्रात असणे बंधनकारक आहे. औद्योगिक, शेती किंवा अन्य अनिवासी क्षेत्रातील जमिनीवर या योजनेचा लाभ मिळणार नाही. यामुळे योजनेतून उभारली जाणारी घरे वास्तव्यासाठी योग्य ठिकाणीच असतील, याची खात्री केली जाणार आहे.

### प्रमाणपत्राशिवाय निधी नाही

देयक प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणखी एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. आर्थिक मदत चार टप्प्यांत दिली जाणार असली तरी, वैध जमीन प्रमाणपत्राशिवाय निधी वितरित केला जाणार नाही. हे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना (शहरी)च्या अधिकृत पोर्टलवर नोंदणी करावी लागेल. त्यानंतर संबंधित यंत्रणेकडून प्रत्यक्ष पाहणी व पडताळणी करून प्रमाणपत्र जारी केले जाईल आणि त्यानंतरच हप्त्यांचे वितरण होईल.

### गरजूंसाठी योजना

अधिक परिणामकारक या योजनेतील बदलांचा उद्देश योजनेचा गैरवापर रोखणे आणि शहरी भागातील खऱ्या गरजू, गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबांना सुरक्षित व परवडणारे घर उपलब्ध करून देणे हा आहे. त्यामुळे अर्जदारांनी नियमांचे काटेकोर पालन करून आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करणे गरजेचे ठरणार आहे.

### 'ही' आवश्यक कागदपत्रे

पात्रता तपासणीसाठी काही कागदपत्रे सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. यामध्ये जुने वीज किंवा पाणी बिल, ३१ ऑगस्ट २०२४ पूर्वीची नगरपालिका मालमत्ता कराची पावती, तसेच जुन्या मतदार यादीतील नाव यांचा समावेश आहे. या आधारे अर्जदार त्या तारखेपूर्वी जमिनीचा मालक होता की नाही, याची खातरजमा केली जाणार आहे.